|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078


श्री महालक्ष्मी
माहात्म्य
व्रत कथा
पूजा विधि
५० लाख +
महिलांच्या पसंतीच
एकमेव जय हिंद प्रकाशनचे
श्री महालक्ष्मी व्रत
जय हिंद प्रकाशन

## श्रीमहालक्ष्मीव्रत करणाऱ्यांसाठी मार्गदर्शन

१. हे व्रत सुख, शांती, धन–संपत्ती व श्रीलक्ष्मीची कृपा मिळवण्यासाठी करावयाचे आहे. व्रत करणारे स्त्री–पुरुष शरीराने व मनाने स्वच्छ व आनंदी असावेत. ह्या व्रताला कोणत्याही महिन्याच्या शुक्ल पक्षातील पहिल्या गुरुवारी सुरुवात करता येईल. दर गुरुवारी श्रीमहालक्ष्मीव्रत पूजाविधीसह करावे. महालक्ष्मीव्रताची कथा व माहात्म्य वाचावे. अशा प्रकारे आठ गुरुवार हे व्रत आचरून शेवटच्या गुरुवारी उद्यापन करावे. तसेच हे व्रत वर्षभरही करता येते. वर्षभर दर गुरुवारी आपल्या कुलदेवतेसमोर किंवा देवीच्या छायाचित्रासमोर बसून श्रीमहालक्ष्मीव्रतकथा व माहात्म्य ह्यांचे वाचन करावे.

२. व्रताचे उद्यापनाचे दिवशी आठ सुवासिनींना अगर आठ कुमारिकांना घरी बोलवावे. प्रत्येकीला पाटावर किंवा आसनावर बसवून ती व्यक्ती महालक्ष्मीस्वरूप समजून तिला हळदकुंकू लावावे. पूजा व आरती संपल्यावर प्रसाद म्हणून फळ आणि ***या पोथीची एक प्रत प्रत्येकीला द्यावी*** व नमस्कार करावा. हेच ह्या व्रताचे उद्यापन. पुरुषांनाही हे व्रत करता येईल. त्यांनीही महालक्ष्मी माहात्म्य व कथा वाचावी, आणि उद्यापनाच्या वेळी स्त्रीयांच्या किंवा कुमारिकांच्या हातावर हळदकुंकू वाहून. सुवासिक फूल द्यावे, एक पोथी द्यावी व त्यांना देवीस्वरूप समजून नमस्कार करावा. मार्गशीर्षात चार किंवा पाच गुरुवार आल्यास पहिल्या गुरुवारी हे व्रत सुरू करून चौथ्या किंवा पाचव्या गुरुवारी (अमावास्या असली तरीही) व्रताचे उद्यापन करावे.

३. व्रताचे दिवशी उपवास करावा. केळी, फळे, दूध घ्यावे. उपाशी राहू नये. रात्री गोडाचे जेवण करून देवीला नैवेद्य दाखवून सर्वांसह भोजन घ्यावे. हे व्रत संसारी जोडप्यांसाठी पद्मपुराणात सांगितले आहे. काही कारणांनी हे व्रत करताना अडचण येते, तेव्हा त्यांनी दुसऱ्याकडून पूजा करवून घ्यावी. उपवास मात्र स्वतः करावा. तो गुरुवार मोजू नये.

४. इतर कोणतेही उपवास असताना हे गुरुवार व्रत आले तरी हे व्रत करावे. रात्री पूजा करावी. वाटल्यास रात्री जेवू नये. ज्यांना हे व्रत दिवसा करता येत नसेल, त्यांनी रात्री करावे. फक्त दिवसा भोजन करू नये. निराहार राहू नये.

५. या पोथीश्रवणाचा लाभ सर्वांना द्यावा. पोथी वाचताना एकाग्रता व शांतता असावी. पोथीवाचनाचे वेळी महालक्ष्मीचे अस्तित्व गुप्त स्वरूपात जाणवेल. शांतता व मनाची एकाग्रता असणाऱ्यांना सुवासही जाणवेल.

## ※ श्रीमहालक्ष्मीची स्थापना आणि विसर्जन ह्यांचा पूजाविधी ※

१. ही पूजा ब्राह्मणाशिवाय आपणच करावयाची आहे. घरात देवतेचें तोंड पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे करून स्थापना करावी. घरातील जागा शक्यतर गाईच्या शेणाने सारवावी, फरशी असल्यास ओल्या फडक्याने पुसून घ्यावी. त्यावर चौरंग किंवा पाट ठेवून सभोवार रांगोळी घालावी. चौरंग किंवा पाटाच्या मध्यभागी थोडे गहू किंवा तांदूळ वर्तुळाकार पसरून ठेवावेत. तांब्याचा किंवा इतर धातूचा एक तांब्या स्वच्छ घासून त्यात पाणी भरावे. त्या पाण्यात एक सुपारी, पैसे व दूर्वा घालाव्यात. कलशाच्या तोंडावर पाच प्रकारच्या झाडांच्या डाहळ्या किंवा पाच झाडांची प्रत्येकी पाच पाने रचून त्यावर नारळ ठेवावा. नारळाची शेंडी वर असावी. कलशाच्या बाहेरच्या अंगाला सर्व बाजूंनी हळदकुंकवाची बोटे लावून तयार केलेला कलश पाटावरील तांदळाच्या-गव्हाच्या वर्तुळावर ठेवावा. श्रीमहालक्ष्मीचे यंत्र पुठ्ठ्यावर चिकटवावे किंवा त्या चित्राची तसबीर कलशाला टेकून समोर ठेवावी.

२. नंतर स्वतः 'ॐ केशवाय नमः। ॐ नारायणाय नमः। ॐ माधवाय नमः।' असे म्हणून आचमन करावे 'ॐ गोविंदाय नमः।' असे म्हणून पळीने पाणी हातावर घेऊन ते ताम्हनात सोडावे. नंतर तुळशीपत्राने किंवा दूर्वेने तसबिरीवर व कलशावर थोडे पाणी शिंपडून देवीला स्नान घालावे. हळदकुंकू, फुले अर्पण करून अगरबत्ती व धूप दाखवावा व दीपाने ओवाळावे. नैवेद्य अर्पण करून मनात देवीला आपली विनंती करावी.

३. श्रीमहालक्ष्मीसमोर पाटावर बसून कथा व माहात्म्य वाचावे. वाचता येत नसल्यास किंवा अडचण असल्यास दुसऱ्याकडून वाचून घेऊन ऐकावे. हात जोडून मनात देवीला आपली इच्छा सांगून ती पुरी करण्याची विनंती करावी, श्रीमहालक्ष्मी नमन अष्टक म्हणावे व आरती म्हणून निरांजन ओवाळावे. साष्टांग नमस्कार घालावा. रात्री परत लक्ष्मीची पूजा करून गोड पदार्थांचा महानैवेद्य देवीला दाखवावा. गायीसाठी अन्न काढून त्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी नेऊन द्यावे. नंतर कुटुंबातील इतर माणसांसह भोजन करावे.

४. दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान केल्यावर कलशातील डहाळ्या किंवा पाने निरनिराळ्या पाच ठिकाणी ठेवावी. समुद्र, नदी, विहीर, तलाव किंवा तुळशीवृंदावन अशा ठिकाणी कलशातील पाणी ओतावे. नंतर पूजा केलेल्या ठिकाणी तीन वेळा हळदकुंकू वाहून लक्ष्मीचे स्मरण करून नमस्कार करावा. याप्रमाणे त्या महिन्यातील दर गुरुवारी व एकंदर आठ गुरुवार होईपर्यंत हे पूजन करावे. मार्गशीर्षात पहिल्या गुरुवारपासून सर्व गुरुवारी हे व्रत करावे. श्रीमहालक्ष्मीने 'दरवर्षी हे व्रत करणाऱ्यांना मी सुखी व समृद्ध करीन' असे अभिवचन दिल्याचे पद्मपुराणात सांगितले आहे.

५. ह्या व्रताला केशरीव्रतही म्हणतात. पूजा करताना कोणत्याही रंगाचे धूत वस्त्र कटाक्षाने नेसावे. गुरुवार हा श्रीदत्तगुरुंचाही दिवस असल्याने त्याला आणखी महत्त्व आहे. 'ॐ श्रीम् नमः' ह्या मंत्राचा रोज रात्री एक हजार जप केल्यास फार चांगले अनुभव येतात.

## ॥ श्रीमहालक्ष्मी नमन अष्टक ॥

श्रीगणेशाय नमः। इन्द्र उवाच।

नमस्तेऽस्तु महामाये, श्रीपीठे सुरपूजिते। शंखचक्रगदाहस्ते, महालक्ष्मि नमोऽस्तुत ते॥१॥
नमस्ते गरुडारूढे, कोलासुरभयंकरि। कुमारि वैष्णवि ब्राह्मि, महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥२॥
सर्वज्ञे, सर्ववरदे, सर्वदुष्टभयंकरि। सर्वदुःखहरे देवि, महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥३॥
सिद्धिबुद्धिप्रदे देवि भुक्तिमुक्तिप्रदायिनि। मंत्रमूर्ते सदा देवि, महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥४॥
आद्यन्तरहिते देवि, आद्यशक्ति महेश्वरि। योगजे योगसंभूते, महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥५॥
स्थूलसूक्ष्ममहारौद्रे महाशक्ति महोदरे। महापापहरे देवि, महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥६॥
पद्मासनस्थिते देवि, परब्रह्मस्वरूपिणि। परमेशि जगन्मातर्महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥७॥
श्वेताम्बरधरे देवि नानांलंकारभूषिते। जगत्स्थिते जगन्मातर्महालक्ष्मि नमोऽस्तु ते॥८॥

# * श्रीमहालक्ष्मीव्रताची कथा (गुरुवारची कहाणी) *

ऐकावी भक्तांनो, श्रीमहालक्ष्मीच्या व्रताची कथा, गुरुवारची कहाणी. ही कहाणी वाचल्याने किंवा ऐकल्याने; दुःख, दारिद्र्य काळजी दूर होते. श्रीमहालक्ष्मीच्या कृपेने समृद्धी, संपत्ती, ऐश्वर्य, वैभव प्राप्त होते. मनीची इच्छा पूर्ण होते. श्रीमहालक्ष्मीची नावे, रूपे अनेक आहेत. सर्व भूतांच्या ठिकाणी ती छाया, शक्ती, तृष्णा, क्षान्ती, जाती, लज्जा, शांती, श्रद्धा, कांती, वृत्ती, स्मृती, दया, तुष्टी, माता, अधिष्ठात्री व लक्ष्मी अशा रूपांनी राहते. तिला नमस्कार असो. कैलासावर पार्वती, क्षीरसमुद्रात सिंधुकन्या, स्वर्गात महालक्ष्मी, भूलोकी लक्ष्मी, ब्रह्मलोकी सावित्री, गोलोकी राधिका, वृंदावनी रासेश्वरी, चंदनवनी चंद्रा, चंपकवनी गिरिजा, पद्मवनी पद्मा, मालतीवनी मालती, कुंदवनी कुंददंती, केतकीवनी सुशीला, कदंबवनी कदंबमाला, राजप्रासादी राजलक्ष्मी, घरोघरी गृहलक्ष्मी अशा विविध नावांनी श्रीमहालक्ष्मी ओळखली जाते. अशा सर्वांच्या परिचयाच्या व सर्वांभूती असलेल्या श्रीमहालक्ष्मीची ही कहाणी आहे.

द्वापारयुगात भारतभूतील सौराष्ट्र देशात भद्रश्रवा नावाचा राजा राज्य करी. तो पराक्रमी होता. चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे ह्यांचे सम्यक ज्ञान त्याला होते. त्याला सुरतचंद्रिका नावाची राणी होती. राणी देखणी, सुलक्षणी व पतिव्रता होती. त्या दोघांना सात पुत्र व त्यांच्या पाठीवर एक कन्या झाली. कन्येचे नाव ठेवले होते श्यामबाला. एकदा महालक्ष्मीच्या मनात आले. आपण त्या राजाच्या राजप्रासादी राहावे. त्यामुळे राजा अधिक सुखी होईल व प्रजेला अधिक सुख देईल. गरिबाकडे राहिले तर तो सारी संपत्ती स्वतःकरताच खर्च करील. म्हणून महालक्ष्मीने वृद्ध ब्राह्मण स्त्रीचे रूप घेतले व ती काठी टेकत टेकत सुरतचंद्रिका राणीच्या महालासमोर उभी राहिली. म्हातारी असली तरी ती तेजस्वी दिसत होती. तिला पाहताच एक दासी पुढे आली. दासीने वृद्ध ब्राह्मणीची नीट विचारपूस केली.

वृद्ध ब्राह्मणीचे रूप घेतलेली श्रीमहालक्ष्मी माता म्हणाली, ''बाळ, माझं नाव कमळा. माझ्या पतीचं नाव भुवनेश. आम्ही द्वारकेला राहतो. तुमची राणी पूर्वजन्मी एका वैश्याची पत्नी होती. तो वैश्य फार दरिद्री होता. रोज त्या दोघांची भांडणं होत. मग नवरा तिला खूप

मारझोड करी. ह्या जाचाला त्रासलेली ती वैश्यपत्नी कंटाळली आणि घर सोडून गेली. रानीवनी उपाशी भटकू लागली. तिची ती दशा बघून मला तिची दया आली. धनसंपत्ती, सुख व समृद्धी देणाऱ्या श्रीमहालक्ष्मीव्रताची मी तिला माहिती सांगितली. माझ्या सांगण्याप्रमाणे तिने लक्ष्मीव्रत केलं. तिला महालक्ष्मी प्रसन्न झाल्यामुळे तिचं दारिद्र्य संपलं. तिचं घर संतती, संपत्ती व समृद्धीनं भरलं. तिच्या जीवनात आनंदीआनंद आला. पुढे ते पतिपत्नी निधन पावले. लक्ष्मीव्रत केल्यामुळे ती दोघं लक्ष्मीलोकात वैभवात राहिली. त्यांनी जितकी वर्षं श्रीमहालक्ष्मीव्रत केलं तितकी हजार वर्षं त्यांना सुखोपभोग मिळाले. ह्या जन्मी त्यांचा जन्म राजकुळात झाला आहे. पण त्या राणीला लक्ष्मीव्रताचा विसर पडला आहे. त्यांची आठवण करून देण्यासाठी मी मुद्दाम आले आहे.''

वृद्धेचे ते बोलणे ऐकून दासीच्या मनात जिज्ञासा उत्पन्न झाली. तिने वृद्धेला नमस्कार केला व म्हणाली, ''माताजी, मला त्या व्रताची माहिती व पूजाविधी सांगा.'' वृद्धेच्या रुपातील महालक्ष्मीने दासीला लक्ष्मीव्रताची माहिती दिली व महिमा सांगितला. मग ती दासी त्या वृद्धेचे उपकार मानून व तिला नमस्कार करून राणीला निरोप सांगण्यासाठी अंत:पुरात गेली. राजवैभवात लोळणाऱ्या त्या राणीला आपल्या ऐश्वर्याचा फार गर्व झाला होता. संपत्तीमुळे व सत्तेमुळे ती उन्मत्त झाली होती. म्हातारीचा निरोप ऐकून ती रागारागाने व तावातावाने आली आणि त्या वृद्ध ब्राह्मण स्त्रीला फटकळपणे बोलली. तिला धक्काबुक्की केली. ती वृद्ध ब्राह्मण स्त्री म्हणजे प्रत्यक्ष लक्ष्मीच होती, हे काही राणीला कळले नाही. राणीचा तो उद्धटपणा पाहू महालक्ष्मीने तेथे न राहता स्वस्थानी जायचे ठरविले. ती राजद्वारातून निघाली. वाटेत तिला श्यामबाला भेटली. श्यामबालेला सगळी हकिकत कळली. तिने त्या वृद्ध ब्राह्मणीची क्षमा मागितली. तेव्हा श्रीमहालक्ष्मीला तिची दया आली. तिने श्यामबालेला लक्ष्मीव्रताची माहिती सांगितली. तो दिवस होता मार्गशीर्ष महिन्यातील पहिला गुरुवार. राजकन्येने महालक्ष्मीचे व्रत सांगितल्याप्रमाणे भावभक्तीने केले. त्यामुळे सिद्धेश्वर राजाच्या मालाधर या राजपुत्राशी तिचा विवाह झाला. ती पतीसह राजवैभवात नांदू लागली. इकडे मात्र महालक्ष्मीचा कोप झाल्यामुळे भद्रश्रवा व राणी सुरतचंद्रिका यांचे राज्य, ऐश्वर्य, वैभव सर्व गेले व त्यांची अन्नान्नदशा झाली. एके दिवशी सुरतचंद्रिका आपल्या पतीला म्हणाली, ''आपला जामात राजा आहे, खूप श्रीमंत आहे. त्याच्याकडे जा. आपले हाल

सांगा. त्याला दया येईल. तो आपल्याला साह्य करील.'' त्याप्रमाणे भद्रश्रवा जावयाच्या राज्यात आला. तो तळ्याच्या काठी बसला असताना पाणी नेण्यासाठी आलेल्या श्यामबालेच्या दासींना तो दिसला. त्याची राजलक्षणे जाणून दासींनी त्याचे नावगाव विचारले. तो श्यामबाला राणीचा पिता आहे, हे कळल्यावर दासी धावत–धावत श्यामबालेकडे गेल्या. त्यांनी सर्व हकिकत तिला सांगितली. दासीकडून राजवस्त्रे पाठवून श्यामबालेने आपल्या पित्याला मोठ्या थाटामाटाने राजवाड्यात आणले. आदरसत्कार केला. नानापरीचा पाहुणचार केला. तो परत जायला निघाला तेव्हा तिने हंडा भरून धन दिले. भद्रश्रवा घरी आला. सुरतचंद्रिकेला आनंद झाला. तिने हंडा उघडला तो काय ? हंड्यात द्रव्य नव्हते. कोळसे भरलेले होते. महालक्ष्मीच्या अवकृपेने हा चमत्कार घडून आला होता.

काही दिवसांनी सुरतचंद्रिका आपल्या लेकीच्या घरी गेली. तो दिवस होता मार्गशीर्षातला शेवटचा गुरुवार. श्यामबालेने महालक्ष्मीव्रत केले. आईकडूनही करविले. सुरतचंद्रिका परत आपल्या नगरात आली. तिने लक्ष्मीव्रत केले म्हणून पूर्वीचे राजऐश्वर्य तिला प्राप्त झाले. पुढे काही दिवसांनी श्यामबाला माहेरी आली. परंतु 'बापाला कोळसे दिले व आपल्याला काही दिले नाही' हा राग सुरतचंद्रिका राणीच्या पोटात खदखदत होता. म्हणून श्यामबालेला कोणी विचारले नाही. तिचा अपमान झाला. परंतु आईवर न रागावता ती तेथून निघाली. निघताना तिने तेथले थोडे ***मीठ***बरोबर घेतले. आपल्या राज्यात राजगृही आल्यावर पतीने तिला विचारले, ''माहेरून काय आणले ?'' ती म्हणाली, ''राज्याचे ***सार*** आणले.'' पती म्हणाला ''म्हणजे काय ?'' पत्नी म्हणाली, ''थोडा धीर धरा म्हणजे कळेल.'' त्या दिवशी तिने सर्व जेवण अळणी करायला सांगितले. नवऱ्याला तिने सर्व जेवण वाढले. त्याला सर्व जेवण ***अळणी*** लागले. मग तिने ताटात थोडे ***मीठ*** वाढले. पदार्थात ते घालताच ***जेवण रुचकर लागले.*** ''हेच ते राज्याचे सार !'' श्यामबालेच्या पतीला तिचे म्हणणे पटले. मग त्या दोघांनी हास्यविनोद करून जेवण पुरे केले. अशा रितीने जे कोणी हे महालक्ष्मीव्रत श्रद्धेने करतील त्या भक्तांवर महालक्ष्मीची कृपा होईल. सुखसमृद्धी व शांती ह्यांचा लाभ होईल. सकळ मनोरथे पूर्ण होतील. मात्र श्रीमंती आल्यावर उतू नये, श्रीमहालक्ष्मीचे व्रत करायला चुकू नये. दर गुरुवारी पोथी वाचायला विसरू नये. 'महालक्ष्मीचा महिमा पुरवितो भक्तांची कामना' अशी ही श्रीमहालक्ष्मीव्रताची कथा गुरुवारची कहाणी सुफळ संपूर्ण ।।

ॐ श्रीमहालक्ष्मीदेव्यै नमः। ॐ ऱ्हीम् श्रीलक्ष्मीभ्यो नमः। ॐ शांतिः शांतिः शांतिः।। श्रीमहालक्ष्मी देवतार्पणमस्तु।।

# ।। ॐ श्रीमहालक्ष्मी माहात्म्य ।।

नमस्तेऽस्तु महामाये श्रीपीठे सुरपूजिते। शंखचक्रगदाहस्ते महालक्ष्मि नमोस्तुऽ ते।।१।। नमस्ते गरुडारुढे कोलासुर भयंकरि। कुमारि वैष्णवि ब्राह्मि महालक्ष्मि नमोऽस्तु ते।।२।।

श्रीगणेशाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । ॐ श्रीम् महालक्ष्मै नमः । ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या । बुद्धीच्या नायका । सकळ विद्यांच्या कारका । नमस्कार तुज एका । करी कार्यारंभी ।।१।। नमो शारदे ब्रह्मनंदिनी । सर्व विद्यांची तू स्वामिनी । सर्व ब्रह्मादिकांची जननी । प्रणवरूपिणी तुज नमन ।।२।। तू मूकासी करिसी वाचाळ । पंगूसी लंघविसी अचळ । ऐसी कृपा तुझी सकळ । महालक्ष्मी तुज नमन ।।३।। ब्रह्ममुखी सरस्वती । स्थापिली तुवां निश्चिती । ब्रह्मा तेव्हा वेदाप्रति । उच्चारिता जाहला ।।४।। शिव सूर्य शक्ति गणपती । विष्णु तूंचि जाहलासी निश्चिती । तुझी पंचायतन आकृति । तुजलागी नमन करी ।।५।। श्रीदत्त वसिष्ठ वाल्मीक। व्यास नारद शुकादिक। पंचायतनभक्त अनेक। यांनी नमिले सर्वदा ।।६।। असो जिची ही स्तुति जाण । त्या लक्ष्मीसी करुनि नमन । करितसे स्तुति आरंभून । भक्तिभावे करुनिया ।।७।। जय भवदुःखविनाशिके। भक्तपालके दुष्टांतके। उत्पत्ति–स्थिति–संहारके। जय लक्ष्मी तुज नमन ।।८।। तू अनंत अवतार धरून । दुष्टजना करिसी शासन । आणि भक्तांचे करी रक्षण । आनंदे करिसी लक्ष्मी तू ।।९।। नमन असो गुरुवरा । सुखनिधान तो गुरुराया । स्मरू त्या पवित्र चरणा । चित्तशुद्धि होईल ।।१०।। लक्ष्मी जे शरण येती तूतें। त्यांच्या नाशिसी तूं दुःखांते। आता प्रसन्न हो आम्हांते। शरण आलो तुजलागी ।।१।। तू सकळ जगाची माता । चराचरी असे तुझी सत्ता । विश्वाची ईश्वरी सर्वथा । आम्हालागी प्रसन्न हो ।।२ ।। लक्ष्मी लज्जे महाविद्ये। श्रद्धे पुष्टि ध्रुवे स्वधे। महारात्रि महा अविद्ये। लक्ष्मीदेवी नमोऽस्तु ते ।।३।। तुझे जे आश्रित भक्तजन । त्यांसी नाही विपत्ति जाण । ते तव आश्रयाते पावोन । धन्य होती त्रैलोक्यीं ।।४।। तू विश्वाची स्वामिनी जाण । यासाठी जगाचे करिसी पालन । विश्वात्मिका असरसी म्हणून । धारण करिसी जगत्रया ।।५।। तू त्रैलोक्याची अखिलेश्वरी । सर्व बाधा प्रशमन करी । विनाशावे आमुचे वैरी । हेचि कार्य करावे ।।६।। तुजसी मागतो हाचि वर । जेव्हा आम्हांसी संकट थोर । पडेल तेव्हा तू अवतार । घेऊनि विघ्न निवारावे ।।७।। तो मालती दत्तात्रेय । शिष्यासी सांगे मार्कंडेय । सूत सांगे शौनकाय । श्रवण तुम्ही करावे ।।८।। ऐका तुम्ही भक्तजन । लक्ष्मीव्रत करी जे कथन । जे आचरता होई प्रसन्न । महालक्ष्मी ती तुम्हांवरी ।।९।। पुरा श्रेष्ठ युगी द्वापारी । पवित्र सौराष्ट्र भूवरी । जी कथा घडली साकारी । तीच आजि कथीन ।।२०।। त्या सौराष्ट्र भूभागी । भद्रश्रवा राजा राज्य करी । ज्ञाता असे तो वेदामाजी । भूलोकी तो पराक्रमी ।।१।। सुरतचंद्रिका नामे राणी । पतिव्रता असे राज्ञी । भूमीवरी ती देखणी । राजाराणी राज्य करी ।।२।। तयांसी संतति असे आठ। सात सुत पाठोपाठ। श्यामवाला नामे धीट। सुता होती तयांची ।।३।। नगरप्रांगणी

उद्यानी । खेळे ती राजनंदिनी । तये वेळी राजगृही । आश्चर्य वर्तले अपार ।।४।। महालक्ष्मी चिंती मनी । राही जरी राजगृही । तरी राजहस्ते जनी । नांदेन सुखसमृद्धी ।।५।। जरी जाईन गरीबा घरी । तो स्वार्थी खर्चिल संपदा सारी । इतर आर्त जनता सारी । दरिद्री राही बिचारी ।।६।। विचार ऐसा करोनि । वृद्ध नारी रूप घेवोनि । हाती काठी ती धरोनी । राजद्वारी प्रकटली ।।७।। होती तेथे एक दासी । धावे दासी दारापासी । पुसे कोण हवे तुजसी । जाणे तुज कोणापाशी ।।८।। तू असशी कोणाची कोण । कोण्या जागां राहसी जाण । राजगृहा येण्या कारण । सांग गे मजसी माउली ।।९।। बोले वृद्धारूपी लक्ष्मी । जगदीश द्विज स्वामी । द्वारके राहतो आम्ही । कमला नामे ओळखी ।।३०।। पूर्वजन्मी तुझी राणी । वैश्यभार्या होती जाणी । संघर्ष करी रात्रंदिनी । ऐसे जीवन तयांचे ।।१।। वैश्य होता महाक्रोधी । रोज रोज पत्नीसी मारी । नानापरी छळ करी । अन्नपाणी ते मिळेना ।।२।। तेणे नारी संतापली । गृहा टाकोनी निघाली । रानीवनी भटकली । दया येई मज तिची ।।३।। मी जावोनि तिजपाशी । पुसिले तिच्या दुःखाशी । उपदेश केला तिजसी । तिचे समाधान करी ।।४।। व्रत देई सुखशांति । लक्ष्मीव्रताची महति । सांगितली तिजसाठी । पूजाविधी कथियेली ।।५।। वर्ते सांगितल्या रीति । करी श्रद्धेने ती भक्ति । लक्ष्मीव्रत ती आचारी । झाली ती लक्ष्मी प्रसन्न ।।६।। दारिद्र्य ते फिटले । कलह तेही संपले । धनधान्य गृही वसे । आनंद झाला श्रीकृपे ।।७।। लक्ष्मीव्रता आचरती । भाग्या नव्हती क्षिती । दोघे लक्ष्मीलोका जाती । श्रीकृपेकरोनिया ।।८।। जेवढी वर्षे केले लक्ष्मीव्रत । तेवढी सहस्र वर्षे वैभवात । राहोनि जन्मली राजकुळात । पूर्वपुण्ये लक्ष्मीव्रताचिया ।।९।। नाना सुखे नाना ऐश्वर्य । भोगाया मिळे त्या राणीस । भुलोनी ऐश्वर्य सुखास । विसर पडे त्या व्रताचा ।।४०।। लक्ष्मीव्रताचे स्मरण । कराया आले मी जाण । सांग माझे आगमन । विस्मृति तुझ्या राज्ञीला ।।१।। ऐकोन तियेचे वच । कौतुक झाले दासीस । श्रद्धेने विचारी वृद्धेस । लक्ष्मीव्रताची महति ।।२।। जोडोनिया दोनी कर । दासी विनवी वृद्धेस । सांगे मज लक्ष्मीव्रत । कैसे केव्हा आचरावे ।।३।। लक्ष्मी वृद्धारूपधारी । प्रसन्न होई दासीवरी । व्रताची महति सारी । कथन करी संक्षेपे ।।४।। मासामाजी मार्गशीर्ष । त्यात असे ईश्वरी अंश । तोचि योग्य लक्ष्मीव्रतास । श्रेष्ठपद मानिला ।।५।। गुरुवारी मासामाजी । वसा घेई राही व्रतस्थ । मन राखी शांत स्वस्थ । शुद्धाचरणी वर्तावे ।।६।। जलपूर्ण कलश वा घागर घेई । तयामाजी पैसा सुपारी दुर्वा घाली । हळदकुंकुमाची बोटे लावावी । कलशाच्या अष्ट दिशांनी ।।७।। पाचवृक्षांच्या फांद्या आणी । त्या कलशमाजी नीट ठेवी । स्वच्छ अशा पाटावरी । तांदुळ थोडे पसरवी ।।८।। जमीन सडासंमार्जन करी । बैठक त्यावरी पाटाची करी । सभोवार रांगोळी रेखावी । कलश ठेवी पाटावरी ।।९।। महालक्ष्मीचे आराधन । प्रेमभावे करावे पूजन । महालक्ष्मी तीचि महाकाली जाण । तीचि महासरस्वती ।।५०।। जो महालक्ष्मीची पूजा करी । तयांवरी कृपा करी निर्धारी । या कारणास्तव पूजा सत्वरी । जगन्माता

*सर्वदा ।।१।।* ती भक्तवत्सला जगन्माता। तियेची पूजा करावी तत्त्वतां। अर्घ्यादि भूषणे गंधाक्षता। पत्र पुष्प धूप दीप नैवेद्य ।।२।। राजोपचारे यथाशक्ति। भावे पूजावी महाशक्ति। सकर्पूर तांबूल अर्पण। भक्तिभावे करावे जाण ।।३।। 'ॐ श्रीम् ऱ्हीम् श्रीम् महालक्ष्मै नमः' म्हणावे। श्रीलक्ष्मीमातेचे पूजन करावे। दूध फल मिष्टान्न ठेवावे। नैवेद्य अर्पावा लक्ष्मीमाये ।।४।। मग देवीची आरती करी। मनोभावे ती प्रार्थना करी। श्रीलक्ष्मीमाते इच्छा सांगावी। जेणे होई कृपा तुजवरी ।।५।। भगवती लक्ष्मी माते। सेवा करी यथामते। यथाशक्ति तव भक्ति। मान्य करी तू माउली ।।६।। मी बालक अज्ञ म्हणोनी। सेवेत चूक क्षमा करोनि। भक्तासाठी येई गे धावोनि। प्रसन्न होई आम्हावरी ।।७।। कृपा करी आम्हावरी। तू राहावे घरीदारी। दारिद्र्यदुःख निवारी। सुखी ठेवी सकळिकां ।।८।। विपुल होवो धन संपत्ती। कधी न येई आपत्ति। दीर्घायु असो संतती। भाग्य तेजस्वी करी ।।९।। कमळासने सुरपूजिते। शंख–चक्र–गदा हस्ते। महामाये जगन्माते। लक्ष्मीदेव्यै नमोऽस्तु ते ।।६०।। ऐशी करावी प्रार्थना। घाली साष्टांग नमना। पूर्ण होती मनःकामना। व्रत ऐसे आचरिता ।।१।। उपास करी दिवसाशी। दूध फळ आहार करी। मनी घेई श्रीनाम परी। जेणे लक्ष्मी कृपा करी ।।२।। सायंकाळी करी गोपूजन। करी महानैवेद्य अर्पण। मग जेवी तू आपण। सहकुटुंबे आनंदे ।।३।। दुसऱ्या दिनी कलशजल। ओती विहिरी वा नदीजली। पाच फांद्या त्या पाच ठिकाणी। एक एक ठेवी तू ।।४।। तू घरी परत येशी। पूजा केली जी त्या ठायी। हळदकुंकू वाहोनि। नमस्कार भावे करी ।।५।। ऐकोनि झाली दासी संतुष्ट। बोले तुज दिले बहु कष्ट। परी न होशी तू रुष्ट। क्षमा करी वृद्ध माये ।।६।। आता जाई राणीपाशी। निरोप देई तिजसी। तेथे थांब तू जराशी। राणी येई झडकरी ।।७।। परी त्या क्षुद्र राज्ञीला। वैभवाचा गर्व झाला। वृद्धेचा निरोप गेला। येई ती गर्व करोन ।।८।। राणी म्हणे, 'का ग थेरडे। कशास येसी मजकडे। कोण ऐकी तुझे पवाडे। निघोनी जाई येथोनि' ।।९।। लक्ष्मी बोले त्या राणीसी। 'राजवैभवे माजसी। उद्दाम उन्मत्त होशी। विसरली पूर्वस्थिती ।।७०।। आज अती शुभ दिन। लक्ष्मीचा करी हा जाण। केलास तुवा अपमान। फळ भोगे तयाचे तू' ।।१।। ऐकोनी ती शापवाणी। रागे लाल झाली राणी। वृद्धे करी मारहाणी। अद्वातद्वा बोलली ती ।।२।। वृद्धा नारी लक्ष्मी माता। मनी म्हणे इथे आता। क्षणभरी न थांबता। जाई सत्वरी स्वस्थाना ।।३।। लक्ष्मी निघाली तेथोनि। श्यामबाला ती सामोरी। दोघा दृष्टिभेट झाली। सुदैव होते कन्येचे ।।४।। वृद्धेकडून तिजला। राजगृही त्या वृत्ताला। कळला श्यामबालेला। क्षमा याची ती बाला ।।५।। देखोनि सालस बाला। वृद्धे येई कळवळा। लक्ष्मीव्रताचा तो वसा। सांगितला तिजलागी ।।६।। दिन असे मार्गशीर्षातला। गुरुवारच असे पहिला। तो लक्ष्मीनारायण पूजिला। राजकन्येने भक्तिभावे ।।७।। अखेरच्या मग गुरुवारी। लक्ष्मी कृपा करी तिजवरी। मनातली तिची इच्छा सारी। परिपूर्ण करिती जाहली ।।८।। सिद्धेश्वर नामे नृप। मालाधर त्याचा

पुत्र । राजकन्ये मिळे वर । विवाह होई तयांचा ।।९।। नृपकन्या सुखी झाली। आनंदे नांदू लागली । कृपा ती लक्ष्मीमाउली । तया सतत लाभली ।।८०।। भद्रश्रवा नृपा आणि । सुरतचंद्रिका राणी । लक्ष्मीच्या शापेकरोनि । दारिद्र्य आले दोघांसी ।।१।। हा म्हणता राज्य जाई । वैभव ते नष्ट होई । अठाविसे दारिद्र्य येई । अन्नान्नदशा पातली ।।२।। लक्ष्मी करी अवकृपा । न चाले ती कोणाची मात्रा । फळे येती ती स्वकर्मा । भोगावी लागती जगी ।।३।। राजाराणी ती म्हणोनी । दुःख भोगी क्षणोक्षणी । हालहाल रात्रंदिनी । भोगी, काय ते सुचेना ।।४।। राणी ती विचार करी । ती बोलली नरपति । जामात आपला भला । साह्य मागावे तयाचे ।।५।। जाई तया राजगृही । सांगा ही दुर्दशा सारी । दया उपजे अंतरी । साह्य काही आजी करी ।।६।। तैसा तो राजा निघाला । जामातनगरी आला । विश्रांती घ्याया बैसला । नदीकाठी तो एकला ।।७।। राजगृहातील दासी । आल्या होत्या त्या पाण्यासी । पाहती भद्रश्रव्यासी । करिती त्या वास्तपुशी ।।८।। कोठेनी झाले आगमन । आहात कोणाचे कोण । आपुले सांगी नाम संपूर्ण । ऐकोनि करू मार्गदर्शन ।।९।। वदनी शोभे राजलक्षण । परी दशा असे हीनदीन । सत्य असेल ते सांगी जाण । करा मन मोकळे सत्वरी ।।९०।। नृप पाही त्या दासीते । सांगे सर्व नातेगोते । नवल होई ऐकोनी । धावत जाती त्वरेने ।।१।। राजगृही श्यामबाला । नृप वृत्तान्त ऐकला । सर्व ऐकोनीच तिला । आश्चर्य होई बहुत ।।२।। श्यामबाले काय केले । मेनका दासीस बोले । वस्त्रभूषणे घेवोनी । पित्यास माझिया आणी ।।३।। भद्रश्रवा आणी राजद्वारी । सत्कार तयाचा करी भारी । सर्व दासदासी सेवेकरी । होते तत्पर नृपाच्या सेवेला ।।४।। पंचपक्वान्नाचे ते भोजन । तैसे कराया मनोरंजन । मधूर गीत वाद्यनर्तन । सर्वसिद्ध होते नृपसेवे ।।५।। काही दिवस राहोनी । पाहुणचार घेवोनी । राजा चाले परतोनी । आपुल्या त्या नगरासी ।।६।। जातांना त्यासी कन्येने । हंडा भरोनी द्रव्याने । पित्या देई प्रेमाने । वंदन करी पित्यासी ।।७।। राजा मनी संतोषोनी । स्वधामा पोचे येवोनी । बोले आपुल्या पत्नीसी । द्रव्य देख जे आणिले ।।८।। हंडा पाहे उघडोनी । आश्चर्य आले घडोनी । द्रव्य ते नष्ट होवोनी । तयाचे कोळसे होती ।।९।। सुरतचंद्रिका अहंकारी । अपमान ती लक्ष्मीचा करी । म्हणोनीच अकल्याण होई । झाले होते सर्व लक्ष्मीसत्ते ।।१००।। कन्या श्यामबाला लक्ष्मीभक्त । आर्या झाली नाही ती उन्मत्त । राजगृही त्या वैभव वित्त । विपुल असे भरभरोनी ।।१।। सुरतचंद्रिका होई भिकारी । जाई एकदा कन्येच्या घरी । तेव्हा माते कुशल विचारी । कन्याप्रेमे करोनी ती बाला ।।२।। मातेस करी नमन । करी आदरसत्कार । दिन असे गुरुवार । मार्गशीर्ष मासातला ।।३।। लक्ष्मीव्रत श्यामबाला । करी भक्ति राजभार्या । मातेसी करवी व्रता । भावभक्ति करोनिया ।।४।। माता राही काही दिवस । निघाली सुरतचंद्रिका । लक्ष्मीव्रत केले म्हणोन । श्रीमंती लाभली तिजसी ।।५।। पुढे काही काळ वर्तता । माहेरी येई श्यामबाला । परी तिथे विचित्र आला । अनुभव मातृकृतीचा ।।६।। न देता द्रव्य पित्यासी । कोळसे देशी तयासी । रिक्त

*हस्ते धाडिलेसी । म्हणोनि माता कोपली ।।७।। त्या श्यामबालेला काही ।* माहेरी न कोणी पुसी । स्वपुत्रीच्या भेटीसही । आली नाही माता राणी ।।८।। *तरी त्या श्यामबालेला ।* मातेचा राग न आला । सत्वरी ती पतिगृहाला । आली गेल्या पाउली ।।९।। निघताना करी गोष्ट । घेइ थोडे तेथे *मीठ* । मग ते धरोनि नीट । निघाली आपुले नगरी ।।११०।। येवोनी पोचे राजमंदिरी । राजा मग बालेस विचारी । गेली होतीस तुझ्या माहेरी । काय आणिले राणी तेथोनी ।।१।। ती त्यावरी उत्तर देई । राज्याचे मी सार आणी । नवल होई ते ऐकोनी । श्यामबालेच्या पतिप्रती ।।२।। तो बोलला पत्नीला । पाहू ते दाखवी मला । ते ऐकोनी श्यामबाला । म्हणे धीर थोडा धरा ।।३।। मग सांगोनि आचाऱ्यासी । भोजन अळणी करवी । पति ते भोजना बैसवी । चकित झाला तेव्हा तोही ।।४।। श्यामबाला काय करी । ताटी थोडे *मीठ* वाढी । तेव्हा वस्तु ताटातली । रुचकरशी लागली ।।५।। बाला तरी खरी चतुर । म्हणे हेच राज्यी सार । मनी करिता विचार । नृपासही पटले ते ।।६।। मग त्या उभयतांनी । लक्ष्मीस्मरण करोनी । भोजन केले आनंदोनी । सुखे ती नांदू लागली ।।७।। असे महालक्ष्मीव्रत । फलदायी सदोदित । करी श्रद्धे जीवनात । सुख लाभेल जगात ।।८।। प्राप्त होई सुखसमृद्धी । धनधान्याची होई वृद्धी । ऐसी व्रताची ह्या प्रसिद्धी । असे सर्वत्र भूवरी ।।९।। स्त्री पुरुष भाविक जन । लक्ष्मीव्रता जे आचरण । त्या ठेवी वैभवात जाण । सत्यसत्य वच हेही ।।१२०।। ऐसे प्रत्यक्ष लक्ष्मीने । जे सांगितले स्वमुखे । पद्मपुराणी विस्तारे । असे वर्णिले सर्वही ।।१।। धनधान्य लाभायासी । सौख्ये ती मिळावयासी । इच्छा पूर्ण व्हावयासी । लक्ष्मीव्रत करावे ।।२।। करोनि भावे लक्ष्मीपूजन । हा महिमा करावा पठण । किंवा करावे ह्याचे श्रवण । म्हणजे फळ लाभेल हाती ।।३।। ऐसे लक्ष्मीव्रत केल्यावरी । यापुढे प्रत्येक गुरुवारी । दिवसामाजी एकदा तरी । महिमा हा पठण करी ।।४।। महालक्ष्मी ती होता प्रसन्न । देईल समृद्धी धनधान्य । भूमी गृह ऐश्वर्य वाहन । लाभेल लक्ष्मीकृपेकरोन ।।५।। ऐश्वर्य प्राप्त झाल्यावरी । करू नये ती शिरजोरी । नम्रतेने गुरुवारी । लक्ष्मीव्रता आचरी ।।६।। करावे स्वतः हे व्रत । सांगावे आप्तस्वकीया । तयांकडोनी करवावे । धनलाभ सर्वा होई ।।७।। असा असे लक्ष्मीव्रताचा महिमा । मालती दत्तात्रेय करी वर्णना । म्हणोनि करी । "ॐ श्रीम् नमः" ।।८।। रोज सकाळी रात्री सहस्र । लक्ष्मीचा करील जो मंत्र । सुखसमृद्धी सिद्धी लाभत । महालक्ष्मी कृपा तयावरी ।।९ ।। ॐ श्रीम् नमः लक्ष्मी मंत्र । संकल्प सिद्धी साक्षात् । सहस्र जप रोज करी । नित्यनेमे करोनिया ।।१३० ।। श्रीभक्त मालती दत्तात्रेय । ग्रंथ लिहवी लक्ष्मी स्वस्फूर्ति । वाचिती ऐकती वा जे भक्ती । कृपा करी महालक्ष्मीमाता ।।१३१।।

* * *

# ※ श्रीमहालक्ष्मीची आरती ※

जय देवी जय देवी जय महालक्ष्मी। वससी व्यापकरूपे तू स्थूलसूक्ष्मी।। धृ।।
करविरपुरवासिनी सुरवरमुनिमाता। पुरहर वरदायिनी मुरहर प्रियकांता।।
कमलाकरे जठरी जन्मविला धाता। सहस्रवदनी भूधर न पुरे गुण गाता।। १।।
मातुलिंग गदा खेटक रविकिरणी। झळके हाटक–वाटी पीयुषरसपाणी।।
माणिकरसना सुरंगवसना मृगनयनी। शशिकरवदना राजस मदनाची जननी।। २।।
ताराशक्ति अगम्या शिवभजका गौरी। सांख्य म्हणती प्रकृती निर्गुण निर्धारी।।
गायत्री निजबीजा निगमागम सारी। प्रकटे पद्मावती निजधर्माचारी।। ३।।
अमृतभरिते सरिते अघदुरिते वारी। मारी दुर्घट असुरां भव दुस्तर तारी।।
वारी मायापटल प्रणमत परिवारी। हे रूप चिद्रूप तद्रूप दावी निर्धारी।। ४।।
चतुराननें कुश्चित कर्माच्या ओळी। लिहिल्या असतील माते माझे निजभाळी।।
पुसोनि चरणतळी पदसुमने क्षाळी। मुक्तेश्वर नागर क्षीरसागर बाळी।। ५।।

किंमत ४ रुपये

प्रकाशक : रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाउस प्रा. लि., जय हिंद प्रकाशन, बी/५, बेसमेंट, क्रिएटिव्ह इंडस्ट्रियल प्रिमायसेस, लोअर परळ, (पू) मुंबई ११ ∗ दूरध्वनी : २३०७५८६७/५८९९ ∗ मुद्रक : निकेडा आर्ट प्रिंटर्स, भिवंडी
नवीन आवृत्ती : डिसेंबर २०१६ ∗ संपर्क : हेमंत रायकर : ९८६७१२६१९६

जय हिंद प्रकाशन

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com